# प्रेस नोट

दिनांक ०९/०७/२०२१

नेरूळ पोलीस ठाणे, परिमंडळ- ०१ वाशी नवी मुंबई

---

## टेम्पोसह घरगुती गॅस सिलींडर चोरी करणारा ०१ आरोपी अटक ०४ गुन्हयांची उकल करण्यात नेरूळ पोलीसांना यश

---

मा. पोलीस आयुक्त सो, श्री बिपीन कुमार सिंग, मा. सह पोलीस आयुक्त सो, डॉ. श्री. जय जाधव, मा. पोलीस उपआयुक्त श्री. सुरेश मेंगडे सो. परि - ०१ वाशी, मा सहा पोलीस आयुक्त श्री भरत गाडे सो, तुर्भे विभाग, यांनी दिवसा व रात्रौ चोरीच्या गुन्हयांना आळा घालण्याच्या दृष्टीने प्रभावी व परिणामकारक रात्रगस्त करण्याबाबत तसेच दाखल गंभीर स्वरूपाचे गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याच्या दिलेल्या सुचनांनुसार मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री शाम शिंदे यांचे मार्गदर्शनानुसार पो.नि. श्री. सुनिल गवळी (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरणाचे सपोनि राजेंद्र घेवडेकर, सपोनि/ सचिन मोरे व स्टाफ यांनी नेरूळ पोलीस ठाणे **गुन्हा नोंद कं. २४०/२०२१ भादवि कलम ३७९** मधील पाहिजे अज्ञात आरोपींना गुप्त वातमीदार व तांत्रिक माहिती आधारे अनेक दिवस पाळत ठेवून दिनांक ०७/०७/२०२१ रोजी रात्रौ २१:०० वा च्या सुमारास तक्कागांव,दर्गा जवळ,पनवेल ता पनवेल येथे साफळा रचुन **१) श्रीराम गोपीलाल बिष्णोई, वय-२३वर्षे,सध्या रा. तक्कागांव,पनवेल ता पनवेल जि रायगड मुळ रा. बोजासर गांव ता बोजासर जि जौधपुर राज्य-राजस्थान** यास ताब्यात घेवून आरोपीतांकडे कौशल्यपुर्ण तपास करून अटक आरोपीतांकडून खालील नमुद गुन्हे उघडकीस आणले आहेत.

**१) नेरूळ पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. I २४०/२०२१, भादवि कलम ३७९,**
**२) नेरूळ पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. I ५१/२०२१ भा.द.वि कलम ३७९**
**३) नेरूळ पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. I १८६/२०२१ भा.द.वि कलम ३७९**
**४) एपीएमसी पो.स्टे गुन्हा रजि नं. I १११/२०२१ भा.द.वि कलम ३७९**

उपरोक्त गुन्हयातील खालील नमुद मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| १) नेरूळ पो.स्टे कडील एकुण- ९३ घरगुती सिलींडर किमंत - | ५,००,०००/- |
| २) एपीएमसी पो.स्टे एकुण- २२ कमर्शियल सिलींडर किमंत - | २,००,०००/- |
| ३) महिंद्रा कं.चे तीन चाकी एकुण तीन टेम्पो किमंत - | ३,००,०००/- |
| **एकुण जप्त मुद्देमाल** | **- १०,००,०००/-** |

**अशा प्रकारे आरोपीतांकडून उपरोक्त गुन्हयातील चोरीस गेलेली १००% मालमत्ता हस्तगत करून एकुण- ०४ चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत**

मा. पोलीस आयुक्त सो, श्री विपीन कुमार सिंग, मा. सह पोलीस आयुक्त सो, डॉ. श्री. जय जाधव, मा. पोलीस उपआयुक्त श्री. सुरेश मेंगडे सो. परि - ०१ वाशी, मा सहा पोलीस आयुक्त श्री भरत गाडे सो, तुर्भे विभाग यांनी नेरूळ पोलीस ठाण्याचे अभिनंदन केले असुन त्यांनी तपास पथकातील वपोनि शाम शिंदे, पो.नि. श्री. गवळी (गुन्हे), **सपोनि राजेंद्र घेवडेकर, सपोनि/ सचिन मोरे, पो.हवा./१०४० झांजे, पो.ना./१५ बिरारी, पो.ना./२३२० पाटील, पो.शि./३१४८ सानप, पो.शि./१५२७ इंगळे, पो.शि/३२२५ आव्हाड** या तपास पथकाचे अभिनंदन केले आहे.